मुख्य कार्यालय
विरार (प)
ता. वसई, जि. पालघर
पिन कोड - ४०१३०३

दुरध्वनी :०२५०-२५२५१०५/०६/२५२९८८८/२५२९८९०
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई- मेल :vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. :- व.वि.श.म./वृ.प्रा-उद्यान/१०९७/२५-२६
दिनांक :- ३१ /१०/२०२५

# स्वारस्य अभिरूची सुचना
## प्रथम मुदतवाढ

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील खालील तक्त्यात नमूद उद्यांनाकरीता **आरक्षीत भुखंडावर व गुरचरण जागेवर मियावाकी पध्दतीने वृक्षलागवड** करणेकरीता Public Private Partnership तत्वावर देखभाल व संचालन करावयाचे आहे. तरी, शहरातील सर्व विकासक, सार्वजनिक संस्था, बँक इंडस्ट्रीयल असोसिएशन, अशासकीय संस्था यांना सुचित करण्यात येते की, आपण सदर उद्यांनाकरीता आरक्षीत भुखंडावर व गुरचरण जागेवर मियावाकी पध्दतीने वृक्षलागवड करणेकरीता देखभालीचे काम Public Private Partnership तत्वावर करणेस इच्छूक असल्यास वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागास विहित नमुन्यात लेखी अर्ज करावा.

➢ कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे :-

१) आरक्षीत भुखंडावर व गुरचरण जागेवर मियावाकी पध्दतीने करण्यात येणाऱ्या वृक्ष लागवडीचा सविस्तर आराखडा महापालिकेस सादर करण्यात यावा.

२) मालकीच्या उद्यांनाकरीता वृक्षलागवड करणेकरीता असलेल्या झाडांची निगा राखणे, वेळोवेळी पाणी मारणे, झाडांना औषध फवारणी करणे, शेणखत घालणे, जमिनीची मशागत करणे, वेळोवेळी झाडांची योग्य पदधतीने छाटणी करणे तसेच गवत कापणे व शोभा वाढविण्याच्या दृष्टिने सुशोभिकरण करणे.

३) तसेच वेळोवेळी महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांनुसार उद्यानांतील आरक्षीत भुखंडावर व गुरचरण जागेवर मियावाकी पध्दतीने पालन करणे.

याकरीता, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील नोंदणीकृत संस्थांनी तक्त्यात नमूद केलेल्या उद्यांनाकरीता आरक्षीत भुखंडावर व गुरचरण जागेची Public Private Partnership तत्वावर देखभाल व संचालन विना मोबदला करावयाचे आहे. तरी, शहरातील सर्व विकासक, सार्वजनिक संस्था, बँक इंडस्ट्रीयल असोसिएशन, अशासकीय संस्थानी सहभाग नोंदवावे व त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादरीकरणासह सादर करावा. तद्नंतर सादरीकरणाच्या अनुषंगाने निवड करण्यात येईल.

(सही/-)
(स्वाती देशपांडे)
उप-आयुक्त तथा वृक्षअधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
वृक्षप्राधिकरण उद्यान विभाग